# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- `22.09.2025 वार-सोमवार

---

**<u>नवरात्र</u>**

आजपासून शारदीय नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली आहे. शहरात चतु:श्रृंगी मंदिरासह विविध मंदिरात आकर्षक सजावट , विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. तसेच मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी दिसून येत आहे. तर वरसगाव इथल्या प्राचीन शिवकालीन श्री काळुबाई मंदिरात देवीची घटस्थापना पारंपरिक रितीनुसार करण्यात आली. नऊ दिवसांच्या उत्सवात होम हवन, भजन, कीर्तन यांसह देवीला शिवकालीन अलंकार अर्पण करण्याचा कार्यक्रम होणार आहे.

दरम्यान पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड अर्थात पीएमपीएमएलतर्फे नवरात्रोत्सवानिमित्त देवीच्या शक्तिस्थळांपर्यंत ५०० रुपयांत विशेष बससेवा पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उद्यापासून ही सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून पुणे स्थानक येथून सकाळी साडेआठ वाजता या बस सुटणार आहेत.

**<u>भरणे</u>**

देशात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला उच्चांकी दर देणाऱ्या साखर कारखान्यांच्या कामकाजाची माहिती घेऊन इतर साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचा उसाला अधिकाधिक दर देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव, कामगारांना वेळेत वेतन, बोनस देणाऱ्या साखर कारखान्यांना राज्य शासनाच्यावतीने सहकार्य केलं जाईल असं प्रतिपादन राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं आहे. ते आज पुण्यात द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या ७० व्या वार्षिक अधिवेशन आणि साखर प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राज्यात अतिवृष्टीमुळे ६६ लाख एकर क्षेत्राचे नुकसान झाले असून या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत असून दिवाळीपूर्वी शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात येईल असे आश्वासन भरणे यांनी यावेळी दिलं.

**<u>औषधजीएसटी</u>**

औषधांवरील वस्तू आणि सेवा कर म्हणजेच जीएसटीत कपात केल्यानंतर आता ग्राहकांना औषधे आणि वैद्यकीय उपकरणे कमी दरात मिळणार आहेत. औषध नियंत्रकांनी कंपन्या आणि वितरकांना याबाबत निर्देश दिले असून

औषध विक्रेते आजपासूनच स्वस्त दरात औषधे देतील असं ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स असोसिएशनने जाहीर केलं आहे. त्यामुळे आधीच्या किमतीने छापलेली औषधे सुद्धा आता नव्या कमी दरातच ग्राहकांना मिळतील. बहुतांश औषधांवरील जीएसटी १२ वरून ५ टक्क्यांवर आणला आहे. यासाठी वितरक आणि विक्रेत्यांना मार्गदर्शन आणि सहकार्य करण्याचं काम असोसिएशन करणार असल्याचं पुणे जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे सचिव अनिल बेलकर यांनी सांगितलं आहे.

**<u>शून्यकचरा</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दापोडी इथल्या शून्य कचरा प्रकल्पाची आयुक्त शिखर सिंह यांनी आज पाहणी केली. हा प्रकल्प वैष्णवी महिला बचत गटाच्या माध्यमातून चालवला जात असून, याठिकाणी आधुनिक यंत्रांच्या सहाय्याने खतनिर्मिती केली जाते.

**<u>धिक्कार</u>**

पुणे कराराविरोधात बहुजन समाज पक्षाच्यावतीने येत्या २४ सप्टेंबर रोजी 'पुणे करार धिक्कार परिषद' येरवडा इथल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात होणार आहे. या परिषदेमध्ये बहुजनांच्या चळवळीला नवी दिशा मिळेल अशी आशा पक्षाचे प्रदेश महासचिव डॉ. हुलगेश चलवादी यांनी व्यक्त केली आहे.

**<u>प्रकाशन</u>**

वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रगती होत असून जिनॉमिक्सच्या अभ्यासामुळे एखाद्या व्यक्तीला कोणता आजार होवू शकतो याचा अंदाज येवू शकतो तसेच भविष्यात जिनॉमिक्सचं महत्व वाढणार असल्याचं प्रतिपादन आयसीएमआरचे माजी संचालक डॉ. रमण गंगाखेडकर यांनी काल केलं. पुण्यातील ज्येष्ठ स्त्रीरोग आणि प्रसूतीतज्ञ डॉ संजय गुप्ते आणि डॉ अविनाश भोंडवे लिखित आणि रोहन प्रकाशन प्रकाशित ‘ जिनॉमिक्स – मानवी जीवनाच्या अंतरंगाचा उलगडा ‘ या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. हे पुस्तक डॉक्टर आणि संशोधकांसह सामान्य माणसापर्यंत जीन,पेशी,डीएनए यासारख्या विषयांची माहिती सोप्या भाषेमध्ये पोहोचवत असल्याचं मत सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलपती डॉ शां ब मुजुमदार यांनी यावेळी सांगितले. डॉ अस्मिता गुप्ते , रोहन प्रकाशनचे रोहन चंपानेरकर यावेळी उपस्थित होते.

**<u>कवीभेट</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या इंद्रायणीनगर प्राथमिक शाळेत काव्यवाणी काव्यसंस्थेच्या माध्यमातून "कवी विद्यार्थ्यांच्या भेटीला" हा उपक्रम आज राबविण्यात आला. कवयित्री संगिता झिंजुरके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी १० ते १२ विद्यार्थ्यांनी आपल्या कविता सादर केल्या. सुप्रिया यादव आणि आरोही निकाळजे या

विद्यार्थिनीच्या कविता राज्यस्तरीय बालकवी संमेलनासाठी निवडल्या गेल्या. संस्थेच्या अध्यक्ष वाणी ताकवणे यांनी यावेळी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

**<u>डूडूळगाव</u>**

पिंपरी चिंचवड हद्दीतील डूडूळगाव परिसराचा पिनकोड आता 411- 081 असा बदलला आहे. ८ मार्च २०२५ पासून चऱ्होली शाखा उपडाकघरात रूपांतरित करण्यात आली असल्याने सर्व टपाल वाटप आणि सरकारी सेवा चऱ्होली उपडाकघरातून मिळतील. पुणे ग्रामीण विभागाच्या अधीक्षकांनी नागरिकांना या बदलाची नोंद घेऊन डाक विभागाच्या सर्व सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

**<u>चोरी</u>**

चतुःश्रृंगी पोलिसांनी बीएसएनएलच्या तारांची चोरी करणाऱ्या परराज्यातील एका टोळीला अटक केली आहे. त्यांच्याकडून २९ लाखांपेक्षा जास्त किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात सकाळपासून काही ठिकाणी मध्यम पावसाळा सुरूवात झाली होती मात्र दुपार नंतर काही भागात विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. उद्याही आकाश ढगाळ राहून हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागान वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत.उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर,संध्याकाळी सहा वाजता,ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार.**